# अमरावती महानगरपालिका अमरावती

**कार्यालय :-** महानगरपालिका अमरावती
जा. क्र. अमनपा/ ----- झोन क्र. /-------/२०१८.
दिनांक :-

**प्रति,**

------------------------------------

---------------------------------------

---------------------------------------

**विषय :- दहीहांडी / गणेशोत्सव / नवदुर्गोत्सव इत्यादी धार्मीक/ सामाजिक उत्सव साजरा करण्याकरीता मंडप उभारण्याची परवानगी मिळण्याबाबत.**

**संदर्भ :-** आपला दि. / /२०१८ वरील विषयाबाबतचा अर्ज.

**<u>ना- हरकत परवानगीच्या अटी व शर्ती</u>**

१) महानगरपालिकेचे परवानगी नंतर पोलीस प्रशासनाची व वाहतुक विभागाची परवानगी घेणे आवश्यक राहील. पोलीस प्रशासनाच्या परवानगी शिवाय मंडप, बुथची उभारणी करता येणार नाही. तसेच कार्यक्रमाचे आयोजन बेमुदत धरणे आंदोलना करता येणार नाही.

२) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्र. ईएनव्ही-२०१०/प्र.क्र.२०१६/ ता.क्र. ३ दि. ०३/०५/२०११ अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे सार्वजनिक उत्सव साजरा करणारी मंडळे यांचेकडून सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

३) महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभाग, वन विभाग, नगरविकास विभाग, व ईतर विभागांनी वेळोवेळी पारीत केलेल्या शासन निर्णय व मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन संबंधीत अर्जदाराने करणे बंधनकारक आहे.

४) मंडपाच्या ठिकाणी ओला कचरा व सुका कचरा यासाठी स्वतंत्र्य कचरा कुंडया ठेवाव्या.

५) नैसर्गिक / सार्वजनीक साधन संपत्तीची तसेच पर्यावरणाची हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६) मंडप/ बुथ/पेंडाल/ स्टेज उभारणी करीत असतांना, रस्ते, पादचारी मार्ग, नागरीकांना अडथळा विरहीत राहतील तसेच रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) आजुबाजुच्या लोकांना त्रास होणार नाही. तसेच इजमेन्टस ऑफ राईटस चे हक्क बाधीत होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

८) विद्यमान रस्त्याचे पृष्ठभाग न फोडता व रस्त्यावर कोणतेही खड्डे न करता मंडपाचे/ शामियानाचे खांब डब्यामध्ये रेती, माती भरुन उभे करावे. रस्त्यावर व पादचारी मार्ग खोदण्यात येवू नये.

९) समक्ष प्राधिकाऱ्यांचा पुर्वपरवानगी शिवाय ध्वनीक्षेपण यंत्रणा वापरण्यात येवू नये.

१०) मंडप / पेंडाल / स्टेज तत्सम रचनेजवळ जाहिरात फलक, फ्लेक्स, सक्षम प्राधीकरणाचे पुर्वपरवानगी शिवाय लावण्यात येवू नये.

११) ध्वनीक्षेपकाचा वापर करीत असतांना, ध्वनीप्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम अनुसार, ध्वनीची तिव्रता विहित महत्तम ध्वनी पातळीपेक्षा अधिक होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी.

**SCHEDULE**

[See rules 3(1)and 4(1)]

AMBIENT AIR QUALITY STANDRDS IN RESPECT OF NOISE

**• ध्वनी प्रदुषण नियंत्रण नियम -२००० अन्वये अनुज्ञेय पातळी**

| अ. क्र. | एरिआ कोड | क्षेत्र वर्गवारी / झोन | आवाजाची अधिकतम क्षमता (A) Leq | |
|---|---|---|---|---|
| | | | दिवस (सकाळी ०६:०० ते रात्री १०:०० पर्यंत) | रात्र (रात्री १०:०० ते सकाळी ०६:००पर्यंत) |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अ | Industrial Area औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| २ | ब | Commercial Area वाणिज्य क्षेत्र | ६५ | ५५ |
| ३ | क | Residential Area रहिवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| ४ | ड | Silence Zone शांतता क्षेत्र | ५० | ४० |

१२) कार्यक्रम संपल्यानंतर मंडप काढून टाकावा व जागा पुर्ववत करून द्यावी. जागेवर कोणतेही स्वरूपाचे स्थायी बांधकाम करू नये.

१३) विद्युत वाहीनीपासून धोका निर्माण होणार नाही याबाबत एम.एस.ई.बी. कडून तपासणी करून घ्यावी.

१४) अवैधपणे विद्युत पुरवठा घेण्यात येवू नये.

१५) आगीपासून सुरक्षतेकरीता स्वत: पर्याप्त व्यवस्था करावी.

१६) रस्त्यावर कुठल्याही प्रकारचे खड्डे करून कमाणी, गेट, खांब, मंडप उभारु नये.

१७) खाजगी भुखंडावर भुखंड मालकाच्या संमती शिवाय मंडप / स्टेज/ बुथ/ पेंडाल उभारु नये.

१८) सदर परवानगी कोणत्याही कारणाशिवाय, केव्हाही रद्द करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला आहे.

**<u>महत्वाच्या सुचना</u>**

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २३४ अन्वये महानगरपालिका क्षेत्रांतर्गत कोणताही कार्यक्रम महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय मंडप, तात्पुरते बुथ इत्यादी उभारणी करता येणार नाही.

२) ७.५० मीटर पेक्षा कमी रुंदीच्या रस्त्याचे जागेत परवानगी अनुज्ञेय राहणार नाही व इतर रुंदीच्या रस्त्यावर रस्त्याचे रुंदीच्या २५% इतकी रुंदी जागेमध्ये अनुज्ञेय राहील. परंतु प्रकरण निहाय प्रत्यक्ष परिस्थिती परवानगी देतांना विचारात घेतली जाईल.

३) बाजार पेठेतील रस्त्यावर परवानगी अनुज्ञेय राहणार नाही.

४) सभा मंडपामध्ये / मंडपामध्ये अग्निशमनाची व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

५) मंडप उभारणी स्थळी दर्शनिय भागावर परवानगीची प्रत लावणे आवश्यक राहील. तसे न केल्यास मंडप अनधिकृतपणे उभारणी केल्याचे ग्राहय धरून नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

६) महानगरपालिकेने परवानगी दिल्यानुसारच मंडप / स्टेज इत्यादी उभारणी संबंधीत अर्जदारावर बंधनकारक राहील.

७) परवानगी व्यतिरिक्त मंडळाने /अर्जदाराने मंडप / स्टेज इत्यादी उभारल्याचे निर्दशनास आल्यास ते महानगरपालिकेचे संबंधीत झोन कार्यालयाचे उपअभियंता पोलीस अधिकाऱ्यांचे मदतीने काढुन टाकण्याची कार्यवाही करतील.

८) मंडप किंवा आरास उभारतांना कमीतकमी एक रुग्णवाहिका किंवा अग्निशामक ची गाडी जाऊ शकेल इतकी जागा सोडावी.

९) महाराष्ट्र शासनाचे दि. २३ मार्च, २०१८ च्या अधिसुचने नुसार प्लास्टिक व थर्मोकॉलचे वापर करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. करीता कोणत्याही मंडळाने अधिसुचनेनुसार प्रतिबंधीत प्लास्टिक व सजावटीकरीता थर्मोकॉलचा वापर करण्यात येवू नये. प्रतिबंधीत वस्तुंचा वापर करण्यात येत असल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र प्लास्टिक व अविघटन शील कचरा (नियंत्रण) कायदा २००६ च्या कलम २ (एच) व कलम ४ चे पोटकलम १ व २ याद्वारे प्रदान अधिकारानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. सदर बाबीस मंडळ/ मंडळाचे पदाधिकारी यांना जबाबदार धरण्यात राहतील.

१०) जनहित याचिका क्र. १५५/२०११ सुस्वराज्य फाऊडेंशन वि. जिल्हाधिकारी, सातारा प्रकरणातील आदेशानुसार जाहिरात किंवा फलक/ होल्डींग उभारण्याआधी महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे. सबब दहिहांडी/ गणेशोउत्सव / नवदुर्गोत्सव इत्यादी धार्मिक/ सामाजिक उत्सव साजरा करतेवेळी फलक/ होल्डींग उभारणी करावयाची असल्यास महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेणे अनिवार्य राहिल अन्यथा मुंगई महानगरपालिका अधिनियम, १९४९, जाहिरात फलक नियंत्रण नियम २००३ तसेच कलम ३ व ४ मालमत्ता विद्रुषपीकरण अधिनियम अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

सदर परवानगी फक्त दिनांक / / ते दि. / / रोजी पर्यंत वैध राहील. वरील अटी व शर्तीचा भंग केल्यास परवानगी नाकारण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**टिप :- १) वरील अटी व शर्तीच्या आधिन राहून परवानगी देण्यात येत आहे. तसेच पुर्णतः तपासणी दरम्यान स्टॉल व मंडपाची साईज परवानगी पेक्षा जास्त आढळल्यास दंडाची रक्कम आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

**उपअभियंता**
**---------- झोन क्र. -----**
**महानगरपालिका अमरावती.**

**प्रतिलीपी -**

१) मा. पोलीस आयुक्त, अमरावती यांना माहितीकरीता सादर

२) पोलीस निरीक्षक, ---------------- पोलीस स्टेशन, अमरावती